<u>नियमीत दरखास्त क्र. ०३/२०१७ मधील नि.क्र. २६ वरील आदेश</u>

(मोतीराम जगताप वि. गोविंदा पवार व इतर)

धनको याने सदर अर्ज हुकूमनाम्याप्रमाणे ०५ आर क्षेत्र त्यांच्या ताब्यात मिळावे याकरीता सादर केला आहे. धनकोचे असे कथन आहे की त्याने प्रस्तुतचे प्रकरण नि.दि.दावा क्र. ६०/२००८ मधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता दाखल केले आहे. ऋणको यांना नोटीसची बजावणी होउन सुध्दा त्यांनी हुकूमनाम्याप्रमाणे क्षेत्राचा कब्जा वादीस दिला नाही. त्यामुळे हुकूमनाम्यातील नमुद ०५ आर क्षेत्रफळाचा ताबा धनको यास मिळण्याकरीता ताबा वॉरंट काढण्यात यावे व अधिक्षक किंवा बेलीफ आणि मोजणी अधिकारी यांची नियुक्ती करावी. आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त मिळावा अशी धनको यांनी विनंती केली.

**०२.** ऋणको यांनी प्रस्तुत अर्जावर कोणतेही म्हणणे सादर केले नाही. सबब ऋणको यांच्याविरुध्द प्रस्तुत प्रकरण एकतर्फा चालविण्यात येत आहे.

**०३.** प्रस्तुत अर्ज व संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. धनको यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. ए.व्ही.जुन्नरे यांचा युक्तिवाद ऐकला.

**०४.** धनको यांचे असे कथन आहे की नि.दि.दावा क्र. ६०/२००८ मधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणी करीता सदर दरखास्त दाखल केली आहे. सदर दरखास्तीच्या नोटीसा ऋणको यांना बजावण्यात आल्या आहेत. परंतु ऋणको यांनी

हुकूमनाम्याचे पालन केले नाही व त्यामधील नमुद क्षेत्रफळाचा ताबा धनको यास दिला नाही. हुकूमनाम्याचे अवलोकन केले असता ऋणको यांनी अतिक्रमण केलेल्या ०५आर क्षेत्रफळाचा ताबा नि.क्र. ४१ नुसार धनको यास द्यावा असे आदेशीत केले आहे. परंतु हुकूमनाम्यानुसार ऋणको याने धनको यास मिळकतीचा ताबा दिला नसल्यामुळे हुकूमनाम्याची अंमलबजावणी होण्याकरीता धनको यांनी मागणी केल्याप्रमाणे ताबा वॉरंट पाठविणे आवश्यक आहे. करीता मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. धनको यांचा अर्ज नि.क्र. २६ मंजुर करण्यांत येतो.

०२. हुकूमनामा प्रमाणे ताबा वॉरंट जारी करण्यात यावा.

०३. हुकूमनाम्यातील क्षेत्रफळाची मोजणी करण्यासाठी उप–अधिक्षक भुमी अभिलेख, कळवण यांची हुकूमनाम्यातील क्षेत्रफळाची मोजणी करण्याकरीता न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करण्यात येते.

०४. संबंधीत पोलीस ठाणे यांनी धनको यांच्या मागणीनुसार ताबा देण्याकामी पोलीस संरक्षण दयावे.

०५. संबंधीत बेलीफ यांनी ताबा देण्याकामी तारीख निश्चित करुन त्याबाबत संबंधीत उप अधिक्षकभुमी अभिलेख कार्यालय व पोलीस ठाणे यांना कळवावे व त्यानंतर मुळ दाव्यातील नि.क्र. ४१ प्रमाणे ०५आर क्षेत्रफळाचा ताबा धनको यास द्यावा.

०६. धनको यांनी न्यायालयीन आयुक्त फीस व पोलीस संरक्षण खर्च परस्पर भरणा करावा.

**०७.** संबंधीत उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय व पोलीस ठाणे यांना कळविण्यात यावे.

सही/-

दिनांक – १२/०३/२०२४.

( पी.के.मुटकुळे )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कळवण.